**प्रेसनोट** **दिनांक २५/०४/२०१९**

## समर्थ पोलीस ठाणे पुणे

## मतदानाच्या दिवशी शस्त्र घेऊन फिरणा-या तरुणास अटक

दि.२३/०४/२०१९ रोजी पो.शि.लक्ष्मण गायकवाड व पोशि दत्तात्रय नलावडे हे पदमजी बिट मार्शल हे पेट्रोलिंग करीत असताना सकाळी १०/०० वा. चे सुमारास ताराचंद हॉस्पिटल जवळ, रास्तापेठ, पुणे याठिकाणी आले असता सदर ठिकाणी एक इसम ॲक्टिव्हा स्कुटर वर संशयास्पद थांबलेला दिसला. बिट मार्शल यांनी त्यास गाडी थांबूवन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव- प्रशांत आशिंगळ वस २२ वर्षे, रा. गुलटेकडी पुणे असे असल्याचे सांगितले. त्यास सदर ठिकाणी थांबण्याचे कारण विचारले तो उडवाउडवीची उत्तरे देवू लागल्याने त्याला ताब्यात घेऊन त्याची व त्याच्याकडील गाडीची झडती घेतली असता त्यामध्ये एक लहान तलवार ७ इंच लांब असलेली मिळुन आली. या संदर्भात सदर इसमाकडे विचारणा करता तो उडवाउडवीची व दिशाभुल करणारी माहिती देत असल्याने त्याला ताब्यात घेऊन त्याचे विरुध्द मा. पोलीस सह आयुक्त, पुणे यांनी शस्त्रे,लाठी,काठी जवळ बाळगण्यास बंदी आदेश जारी केलेले असताना त्याचे उल्लंघन करुन जवळ शस्त्र बाळगले असताना मिळून आल्याने त्याचे विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम- ३७(१) सह १३५ प्रमाणे कारवाई करुण गुन्हा दाखल करण्यात आला.